**ठळक बातम्या**

- भारताला तुकड्यात बघणं हे भारताविषयी अज्ञानाचं लक्षण असल्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- गेल्या आर्थिक वर्षात देशाची निर्यात विक्रमी पातळीवर

- नवीन तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत सुधारणा आणि करचोरी रोखण्यात मदत होत असल्याचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे प्रशंसोद्गार

- यंदाच्या पावसाळ्यात पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८४५ अंकांची घसरण

**<><><><><><>**

देशाच्या संपूर्ण विकासाकरता, आपण निर्णय घेतो, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज एका वृत्तसंस्थेला मुलाखत देत होते. मी गुजरातचाच विकास करतो असा आरोप माझ्यावर केला जातो. गुजरातचा विकास हा भारताचा विकास करताना आपोआप होणार. भारताला तुकड्यात बघणं हे भारताविषयी अज्ञानाचं लक्षण आहे. भारताची विविधता हीच भारताची शक्ती आहे. असं ते म्हणाले. माझ्याकडे मोठ्या योजना आहेत, असं मी म्हणतो तेव्हा त्याबद्दल कुणालाही कसलीही भिती बाळगायचं कारण नाही, गेली दोन वर्ष २०४७ विकसित भारत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर काम सुरु आहे. एक देश एक निवडणूक हे धोरण अंमलात आणण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध आहे, त्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीनं अहवाल सादर केला आहे. त्याची अंमलबजावणी देशासाठी खूप फायद्याची ठरेल, असं मोदी म्हणाले.

निवडणुकीत प्रत्येक मतदार महत्त्वाचा असतो. या सर्व मतदारांचा विश्वास मिळवणं महत्त्वाचं आहे, असं मोदी यांनी सांगितलं. मी गुजरातचाच विकास करतो असा आरोप माझ्यावर केला जातो. गुजरातचा विकास हा भारताचा विकास करताना आपोआप होणार. भारताला तुकड्यात बघणं हे भारताविषयी अज्ञानाचं लक्षण आहे. भारताची विविधता हीच भारताची शक्ती आहे. असं ते म्हणाले.

निवडणुक रोखे योजने मुळे कोणत्या पक्षाला किती पैसे मिळाले हे आता कळतं. निवडणुकांना काळ्या पैशांपासून मुक्त करणे हा यामागचा उद्देश होता, असं त्यांनी सांगितलं. ईडीने केलेल्या कारवाईत 97 टक्के कारवाई अराजकीय व्यक्तींवर केली गेली आहे, असं मोदी यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

देशाचा सर्व क्षेत्रांमधे विकास करणं, हेच लोकशाही आघाडी सरकारचं कायम उद्दिष्ट राहिलं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज तामीळनाडूमधे तिरुनेलवेली इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होते. भाजपा सरकारच्या विविध आश्वासनांचा त्यांनी पुनरुच्चार केला. तामीळनाडूतलं द्रमुक-काँग्रेस आघाडी सरकार अंमली पदार्थ आणि भ्रष्टाचारामधे गुंतलं असल्याचा आरोप त्यांनी केला.

बिहारमधे उद्या मोदी यांच्या दोन सभा होणार आहेत. गया, आणि पूर्णिया या दोन मतदारसंघामधल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराकरता या सभा होणार आहेत. उद्या संध्याकाळी ते गुवाहाटीला जाणार आहेत. बुधवारी नलबार इथं त्यांची सभा होणार आहे.

आसाममधे उद्या काँग्रेसनेत्या प्रियंका गांधी वड्रा यांची सभा जोरहाट इथं होणार आहे. तृणमूल काँग्रे◌ेसच्या अध्यक्ष आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या आठवड्यात आसाममधे प्रचार करणार आहेत.

**<><><><><><>**

२०२३-२४ या आर्थिक वर्षात देशाची निर्यात विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. २०२२ – २३ या वर्षात एकूण निर्यात ७७६ अब्ज ४० कोटी डॉलर्स मूल्याची होती. ती यंदा ७७६ अब्ज ६८ कोटी डॉलर्स मूल्याची असेल असं अनुमान आहे. या वर्षात इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या निर्यातीत सर्वात जास्त म्हणजे २३ पूर्णांक ६४ शतांश टक्के वाढ झाली. औषधं, अभियांत्रिकी यंत्रसामुग्री, लोह खनिज, सुती धागे, आणि हातमागावरच्या वस्त्रांच्या निर्यातीतही लक्षणीय वाढ झाली. शेतमालाच्या निर्यातीतही सात ते एकोणीस टक्के वाढ नोंदवली गेली.

**<><><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत विश्लेषण प्रणाली यांसारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत सुधारणा होत असून, करचोरी रोखण्यात मदत होत आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. नागपुरातल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - NADT मधे भारतीय महसूल सेवेच्या ७६ व्या तुकडीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे करदात्यांचा संबंधित व्यवस्थेवरचा विश्वास वाढतो, आणि नियमित कर भरण्यासाठी प्रोत्साहन मिळतं असंही धनखड म्हणाले.

राज्यपाल रमेश बैस आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष नितीन गुप्ता कार्यक्रमाला उपस्थित होते.

या तुकडीत एकूण ५८ अधिकारी असून, यापैकी २४ महिला अधिकारी आहेत.

**<><><><><><>**

यंदाच्या पावसाळ्यात पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ एम रविचंद्रन यांनी आज नवी दिल्ली इथं नैऋत्य मोसमी पावसाच्या अनुमानाबाबत बातमीदारांना माहिती दिली. जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे,

असं त्यांनी सांगितलं. मात्र वायव्य, पूर्व, आणि ईशान्येकडच्या राज्यांमधे काही भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

संपूर्ण देशात १ जून ते ३० सप्टेंबरदरम्यान पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर राहील, असं भारतीय हवामान शास्त्र विभागाचे महासंचालक मृत्यूंजय मोहपात्रा यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ८४५ अंकांची घसरण झाली, आणि तो ७३ हजार ४०० अकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४६ अंकांची घसरण नोंदवत २२ हजार २७३ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी महाराष्ट्रात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. आतापर्यंत ११ मतदारसंघामधे ३६ उमेदवारांनी ४५ उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

कोल्हापूर आणि हातकणंगले मतदारसंघात आज महायुतीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून संजय मंडलिक आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून धैर्यशील माने यांनी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह, चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ, शंभूराज देसाई, इत्यादी नेते यावेळी उपस्थित होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी हातकणंगले मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. वंचित बहुजन आघाडीतर्फे माढा मतदारसघात रमेश बारस्कर यांनी, तर सोलापुरात राहुल काशिनाथ गायकवाड यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. सातारा लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याआधी काढलेल्या मिरवणुकीत पक्षाध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार

श्रीनिवास पाटील, आमदार पृथ्वीराज चव्हाण, तसंच शिवसेनेसह इतर मित्रपक्षांचे पदाधिकारी आणि नेते सहभागी झाले होते.

**<><><><><>**

घाऊक किमतीवर आधारित चलनफुगवट्याच्या दरात मार्च मधे किंचित वाढ झाली. भाजीपाला,कांदे, बटाटे आणि इंधन तेलाच्या दरांमधे वाढ झाल्यानं महागाईचा दर ५३ शतांशांवर पोहोचला. फेब्रुवारी २०२४मधे हा दर २० शतांश टक्के होता.

**<><><><><>**

१८ व्या लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्याचं मतदान होण्याआधी केलेल्या प्रतिबंधक कारवायांमध्ये देशभरात तब्बल ४ हजार ६५० कोटी रुपये मूल्याचा अवैध माल जप्त केल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगानं दिली आहे. आजपर्यंतची ही विक्रमी जप्ती आहे. या जप्तीमध्ये सर्वाधिक ४५ टक्के वाटा हा अंमली पदार्थांचा असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय महामार्गांचं आणि इतर पायाभूत सुविधांचं बांधकाम करताना पर्यावरण आणि निर्वनीकरणाबाबत प्रबोधनासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आज नवी दिल्लीत एक कार्यशाळा आयोजित केली होती. महामार्ग पर्यावरणस्नेही असावे, अभयारण्य, वनक्षेत्र, अमृत सरोवर, वृक्ष लागवड मोहिमा आणि नवे रस्ते बांधताना टाकाऊ पदार्थांचा उपयोग अशा विविध उपाययोजनांविषयी या कार्यशाळेत माहिती देण्यात आली. प्राधिकरणाचे अध्यक्ष संतोष कुमार यादव, वनविभागाचे महासंचालक जितेंद्र कुमार आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सचिव अनुराग जैन यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केलं.

**<><><><><>**

भारत-फ्रान्स संयुक्त कार्यगटाची १६ वी दहशतवादविरोधी बैठक आज नवी दिल्लीत पार पडली. या बैठकीत दहशतवाद्यांकडून नवीन तंत्रज्ञानाचा वापर, दहशतवादी हेतूंसाठी इंटरनेटचा गैरवापर, कट्टरतावाद आणि दहशतवाद्याना केला जाणारा  वित्तपुरवठा या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. भारतविरोधी फुटीरतावादी कारवाया, संघटित गुन्हेगारी आणि अमली पदार्थाचा पुरवठा करणाऱ्या दहशतवादी नेटवर्कचा मुकाबला करण्यावर दोन्ही गटात  चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं. नो मनी फॉर टेरर' (NMFT) आणि फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सवर या बैठकीत भर देण्यात आला.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरुतल्या एम. चिन्नास्वामी मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैद्राबादच्या ९ षटकात १ बाद ११९ धावा झाल्या होत्या.

<><><><><><>

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह तृणमूल काँग्रेसचे अन्य नेते लोकसभा निवडणुकीपूर्वी मतदारांना धमकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत भाजपने आज नवी दिल्लीत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. या भेटी नंतर माध्यमांशी बोलताना भाजप नेते तरुण चुग यांनी आरोप केला की,तृणमूल काँग्रेस पश्चिम बंगालमधील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहे.

//<><><><><><>//